# कोल्हापूर विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघ बैठकीचे इतिवृत्त दि. ११/०५/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मे २०१२ नंतरच्या पायाभूत पदावरील नियुक्त सर्व शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता कधी होणार ? तसेच मे २०१२ नंतर नियुक्त शिक्षक ज्यांची नावे संचमान्यतेमध्ये नाहीत त्यांच्या संचमान्यतेमध्ये शाळांच्या मागणीनुसार दुरुस्ती व मान्यता कधी होणार? | मे २०१२ नंतरच्या पायाभूत पदावरील नियुक्त सर्व शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव तपासून शासनास सादर करण्यात आले होते. काही प्रस्तावांबाबत त्रुटी असल्यामुळे त्रुटी पूर्ततेबाबत संबंधितांना कळविण्यात आलेले आहे. त्रुटी पूर्ततेसाठी दि. २२/ ते २४/०५/२०१८ या कालावधीत कॅम्पचे आयोजन केले आहे.<br>Google link व या कार्यालयाच्या दिलेल्या लिंक वर माहिती भरावी. | क.म.वि स्तरावर | -- |
| २ | सन २०१७-१८ मध्ये अर्धवेळ शिक्षण सेवक, शिक्षक घडयाळी तासिकेवरील किती शिक्षकांच्या संचमान्यता झाल्या आहेत व किती मान्यता प्रलंबित आहेत? | कार्यालयास प्राप्त सर्व प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात आली आहे. त्रुटी असलेल्या प्रस्तावांबाबत संबंधितांना कळविण्यातआले आहे. त्रुटी पूर्ततेनंतर सदर प्रस्तावांवर मान्यतेबाबतची कार्यवाही करण्यात येईल. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| ३ | सन २०१७-१८ संचमान्यतेमध्ये सेवानिवृत्ती व इतर कारणाने कोल्हापूर विभागातील पदे रिक्त झालेली आहेत? त्या पदावर नियुक्त शिक्षकांची नावे संचमान्यतेत समाविष्ट आहेत का? नसतील तर का नाहीत याचा खुलासा व्हावा. | सन २०१७-१८ संचमान्यतेमध्ये सेवानिवृत्ती व इतर कारणाने कोल्हापूर विभागातील रिक्त पदांबाबतची माहिती संघटनेस उपलब्ध करुन द्यावी.<br>शिक्षकांची नावे संचमान्यतेत समाविष्ट करण्याबाबत संचालनालयाकडून मार्गदशन मागविण्यात येईल. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| ४ | सन २००३ ते २०११ मधील नवीन वाढीव पदामधील किती शिक्षकांच्या संचमान्यता झाल्या आहेत? अर्धवेळ/पूर्णवेळ नवीन वाढीव पदाचे प्रस्ताव क. महाविद्यालयांनी सादर करावेत यासाठी मा. शिक्षण संचालकांचे पत्र सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना अवगत केले होते का? | २००३ ते २०११ मधील नवीन वाढीव पदांपैकी आतापर्यंत १९० मान्यता झालेल्या आहेत. याबाबत संचालनालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. | -- | -- |
| ५ | सन २०१७-१८ मध्ये किती पदे पूर्णवळ व | सन २०१७-१८ च्या संचमान्यतेनुसार अर्धवेळ व पूर्णवेळ प्रस्तावित | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अर्धवेळ प्रस्तावित करण्यात आलेली आहेत? अर्धवळ/पूर्णवेळ नवीन पदाचे प्रस्ताव क. महाविद्यालयांनी सादर करावेत यासाठी मा. शिक्षण संचालाकांचे पत्र सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना अवगत केले होते का? | पदांची माहिती निरंक आहे. | | |
| ६ | वरिष्ठ व निवड श्रेणी वेतनश्रेणी मान्यता प्रस्ताव आपल्या कार्यालयीन स्तरावर महिन्यापेक्षा अधिक काळासाठी प्रलंबित आहेत का? जर प्रलंबित असतील तर ते किती प्रस्ताव आहेत व त्यांच्या मान्यता केव्हा होणार? | कार्यालयाकडे वरिष्ठ व निवड श्रेणीच्या प्रलंबित प्रस्तावांची निर्गती करण्यात यावी. | -- | -- |
| ७ | कायम विनाअनुदानित शाळा/तुकडी विषय यांना ज्या शासन आदेशानुसार आपल्या कार्यालयाकडून मंजूरी दिली गेली त्या शासन आदेशाची झेरॉक्स प्रत मिळावी. | कायम विनाअनुदानित शाळा/तुकडी विषय यांना ज्या शासन आदेशानुसार आपल्या कार्यालयाकडून मंजूरी दिली गेली त्या शाळांना शासन आदेशाची प्रत देण्यात आलेली आहे. तथापि, ज्या शाळांकडे अशी प्रत उपलब्ध नाही त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा. | क.म.वि. स्तरावर | -- |
| ८ | मा. शिक्षण उपसंचालक कोल्हापूर कार्यालयाने दि. १६,१७,१८ एप्रिल २०१८ रोजी आयोजित केलेल्या कॅम्पमध्ये किती प्रस्ताव दाखल करण्यात आलेले आहेत. किती प्रस्तावांवर निर्णय झाला व किती प्रस्ताव प्रलंबित आहेत? | दि. १६,१७,१८ एप्रिल २०१८ रोजी आयोजित केलेल्या कॅम्पमध्ये किती प्रस्ताव दाखल करण्यात आलेले आहेत. किती प्रस्तावांवर निर्णय झाला व किती प्रस्ताव प्रलंबित आहेत याबाबतची माहिती संघटनेस १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| ९ | सन २०१६-१७ च्या भ.नि.नि. स्लिपा पूर्ण झाल्या का? वस्तुस्थिती अहवाल मिळावा. तसेच डी.सी.पी.सी धारकाच्या सन २०१६-१७ व २०१७-१८ च्या फंड स्लिपा केव्हा मिळणार? | सन २०१६-१७ च्या भ.नि.नि. स्लिपाबाबत कार्यवाही सरु असून अधीक्षक, वेतन पथक यांनी लेखे पूर्ण करुन माहे-ऑगस्ट अखेर कार्यवाही पूर्ण करावी.<br>सन २०१६-१७ च्या डी.सी.पी.एस. स्लिपा तयार आहेत. माहे-जून अखेर त्यांचे वितरण करण्यात यावे. सन २०१७-१८ डी.सी.पी.एस. स्लिपांबाबत लेखाधिकारी यांनी लेखे पूर्ण करुन माहे-ऑगस्ट २०१८ पर्यंत स्लिपा वितरणाची कार्यवाही पूर्ण करावी. | लेखाधिकारी/ वेतन पथक स्तरावर | माहे - जून २०१८<br>माहे - ऑगस्ट २०१८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | पेन्शन प्रकरणे दोन महिन्यापेक्षा अधिक काळ आपल्या कार्यालयीन स्तरावर प्रलंबित आहेत का? असतील तर किती प्रकरणे प्रलंबित आहेत याची माहिती मिळवी. | पेन्शन प्रकरणे दोन महिन्यापेक्षा अधिक काळ कार्यालयीन स्तरावर प्रलंबित नाहीत. | -- | -- |
| ११ | शालार्थ मध्ये नावे समाविष्ट करण्यासाठीचे त्रुटी पूर्तता व नियमित प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर केले आहेत का? याची यादी मिळावी. | शालार्थ मध्ये नावे समाविष्ट करण्यासाठीचे त्रुटी पूर्तता व नियमित प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात आलेले आहेत. याबाबतची यादी संघटनेस उपलब्ध करुन द्यावी. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| १२ | अर्धवेळ शिक्षकांच्या सहाव्या वेतन आयोगामधील फरक रोख अथवा खात्यावर केंव्हा जमा होणार याची माहि घेणे. | अधीक्षक, वेतन पथक यांनी याबाबत कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील. | वेतन पथक स्तरावर | -- |
| १३ | संस्थेच्या दोन शाखावरील मिळून एकत्रित पूर्णवेळ कार्यभारावर शिक्षकांची संस्थेच्या शाखेत एकाच ठिकाणी पूर्णवेळ कार्यभारावर बदली करावी असा नवीन शासन निर्णय झाला असल्यास त्या शासन निर्णयाची प्रत मिळावी. | संस्थेच्या दोन शाखावरील मिळून एकत्रित पूर्णवेळ कार्यभारावर शिक्षकांची संस्थेच्या शाखेत एकाच ठिकाणी पूर्णवेळ कार्यभारावर बदली करावी असा नवीन शासन निर्णय झालेला नाही. | -- | -- |
| १४ | या वर्षी वरीष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी अनुक्रमे ११ वर्ष व २३ वर्ष पूर्ण झालेल्या शिक्षकांना प्रशिक्षणाची संधी मिळणार का? | धोरणात्मक बाब आहे. | शासन स्तराव | -- |
| १५ | उच्च माध्यमिक कडे पूर्णवेळ कार्यभारा व्यतिरिक्त पूर्णवेळ शिक्षकास अतिरिक्त (ज्यादा) कार्यभार दिला असेल तर त्या अतिरिक्त (ज्यादा) कार्यभाराचे वेतन का मिळत नाही याचा खुलासा व्हावा. | अशा प्रकरणी माहे रु. ५००/- च्या मर्यादेत अतिरिक्त मानधन दिले जाते. | -- | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर